जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email Id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:- १. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०
३. जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५
४. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे पत्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य, दिनांक १४/०३/२०२०
५. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्रमांक ४०-३/२०२०-DM- १(A) दिनांक २४/०३/२०२०
६. या कार्यालयाचे आदेश क्र. २०२०/उपचिटणीस/एमएजी/सीआर-२६ दि. २४/०३/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दि. २५/०३/२०२०

आदेश:-

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हिड१९) नियंत्रण आणण्यासाठी व त्यांच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. तथापी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, उस्मानाबाद जिल्हयातील नागरीक बाहेर जिल्हयात प्रवास करीत आहेत. तसेच बाहेर जिल्हयातील नागरीकही उस्मानाबाद जिल्हयात येत आहेत. बाहेर जिल्हयातून येणारे नागरीक, प्रवासी, यांचे मार्फत करोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता जिल्हयातील जनतेच्या आरोग्याच्या व सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी/उपचिटणीस/सीआर-२६ दिनांक २४/०३/२०२० अन्वये उपविभागीय दंडाधिकारी यांची उपविभागाचे कार्यक्षेत्राकरीता व तालुका दंडाधिकारी यांची त्यांचे तालुक्याचे कार्यक्षेत्राकीरता (Insident commander) म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी व सुरळीतपणे पुरवठा होण्याकरीता उस्मानाबाद जिल्हयातील डिझेल/पेट्रोलपंप सकाळी १०.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंतच्या कालावधीसाठी चालु ठेवण्याचे आदेश देत आहे. याशिवाय अत्यावश्यक सेवेसाठी

Scanned by CamScanner

त्यांच्या कार्यक्षेत्रात नेमणूक केलेले Insident commander उपविभागीय दंडाधिकारी व तालुका दंडाधिकारी यांनी आवश्यकतेनुसार दिलेल्या आदेशाप्रमाणे डिझेल/पेट्रोलपंप चालु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. Police Welfare Petrol Pump 24x7 सुरु राहील.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद
४. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
५. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना उचित कार्यवाहीस्तव देण्यात येते.
८. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना उचित कार्यवाहीस्तव देण्यात येते.
९. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
१० उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हा उस्मानाबाद
११ उपविभागीय पोलिस अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद
१२. तालुका दंडाधिकारी, जिल्हा उस्मानाबाद
१३. सर्व पोलिस निरीक्षक, जिल्हा उस्मानाबाद
१४ गट विकास अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद

25/3/20
जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

Scanned by CamScanner